दिनांक 31/03/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 204

विषय – महाराष्ट्र सवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर राबविणेकामी शासन निर्णय नगरो-2015/प्रक्र.232/नवि-33दि. 16/05/2016 मधील तरतूदीनुसार सुधारणा कार्यक्रम राबविणेबाबतनिर्णय घेणे.

संदर्भ- 1)मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 29/03/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

2) शासन निर्णय- नगरो-2015/प्रक्र.232/नवि-33दि. 16/05/2016

राज्यातील नागरी भागांचा सुनियोजित विकास साधण्याच्या दृष्टीने राज्यात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) हे अभियान राबविण्यात येते. सदरचे अभियान राबविण्यासंदर्भात सुधारीत तरतूदी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. नगरो-2015/प्रक्र.232/नवि-33दि. 16/05/2016 नुसार स्पष्ट करण्यात आले आहेत. सदर अभियानांतर्गत नगरपरिषदेस अनुदान अनुशेष होण्याकरीता सदरच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. 5 मध्ये नमूद केलेप्रमाणे सुधारणा कार्यक्रम/अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे सुधारणा कार्यक्रम राबविणेस मंजूरी देत आहे.

1. नगरपरिषदेमध्ये व्दिनोंद लेखा पध्दतीचा अवलंब करणे.
2. नगरपरिषद कामकाजाचे पूर्ण संगणकीकरण करणे.
3. मालमत्ता कर विषयक विविध प्रकारच्या सुधारणा करणे.
4. नगरपरिषद हद्दीमध्ये पर्जन्य जल संचय (Rain Water Harvesting) करणे.
5. नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रात पाणी बचतीची उपाययोजना राबविणे.

उपरोक्त नमूद शासन निर्णयाच्या परिच्छेद 4 मध्ये नमूद सुधारीत वित्तीय आकृतीबंधाप्रमाणे निधी प्राप्त होण्यासाठी नगरपरिषदेने सुधारीत वित्तीय आकृतीबंधाचा प्रमाणानुसार देय होणारा नगरपरिषदेचा हिस्सा योजनेसाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर योजने अंतर्गत अनुदान प्राप्त करणेकरीता सुधारीत वित्तीय आकृतीबंधाच्या प्रमाणानुसार देय होणारा नगरपरिषदेचा हिस्सा योजनेसाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खातेमध्ये जमा करणेस मंजूरी देत आहे. तसेच सदर योजनेअंतर्गत मंजूर सर्व कामे/ प्रकल्प कामांसाठी विहीत केलेल्या कालमर्यादेत पूर्ण करणेत यावे. याकामी येणा-या खर्चास व अनुषंगीक खर्चास मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 31/03/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.205

विषय – नगपरिषदेचे आरोग्य विभागाकडील एक वर्षावरील बिले / डिपॉझिट/ बयाणा / घंटागाडी भाडे अदा करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 29/03/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

नगपरिषदेचे आरोग्य विभागाकडील एक वर्षावरील बिले/ डिपॉझिट/ बयाणा / घंटागाडी भाडे अदा करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सप्टेंबर 2018 ते मे 2020 अखेर डिपॉझीट रक्कम परत

| अ.क्र. | कामाचे नाव | कपात केलेली डिपॉझीट रक्कम | वसूलपात्र रक्कम | डिपॉझीटची उर्वरित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जावून घंटागाडीव्दारे ओला,सुका व घातक कचरा वेगवेगळा संकलन करणे, रस्ते यांची दैनंदिन साफसफाई करणे व कच-याची घनकचरा व्यवस्थापन भूमी पर्यंत वाहतूक करणे | 4,24,902.00 | 20,800.00 | 4,04,102.00 |
| 2 | विटा नगरपरिषद हद्दीतील सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुता-या तसेच गटर यांची दैनंदिन साफसफाई करणे व कच-याची घनकचरा व्यवस्थापन भूमी पर्यंत वाहतूक करणे | 2,67,585.00 | 19,800.00 | 2,47,785.00 |
| 3 | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घनकचरा प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे, घनकच-यापासून Manual कंपोस्ट तयार करणे, घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणे | 4,44,529.00 | 33,600.00 | 4,10,929.00 |
| एकूण | | 11,37,016.00 | 74,200.00 | 10,62,816.00 |

पान नं.2 वर

जून 2020 ची बिले

| अ.क्र. | कामाचे नाव | एकूण बील | एकूण वजाती | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जावून घंटागाडीव्दारे ओला,सुका व घातक कचरा वेगवेगळा संकलन करणे, रस्ते यांची दैनंदिन साफसफाई करणे व कच-याची घनकचरा व्यवस्थापन भूमी पर्यंत वाहतूक करणे | 5,27,339.00 | 22,497.00 | 5,04,842.00 |
| 2 | विटा नगरपरिषद हद्दीतील सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुता-या तसेच गटर यांची दैनंदिन साफसफाई करणे व कच-याची घनकचरा व्यवस्थापन भूमी पर्यंत वाहतूक करणे | 3,71,540.00 | 1,18,350.00 | 2,53,190.00 |
| 3 | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घनकचरा प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे, घनकच-यापासून Manual कंपोस्ट तयार करणे, घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणे | 6,16,969.00 | 26,319.00 | 5,90,650.00 |
| एकूण | | 15,15,848.00 | 1,67,166.00 | 13,48,682.00 |

# बयाणा

| अ.क्र. | कामाचे नाव | बयाणा रक्कम |
|---|---|---|
| 1 | विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जावून घंटागाडीव्दारे ओला,सुका व घातक कचरा वेगवेगळा संकलन करणे, रस्ते यांची दैनंदिन साफसफाई करणे व कच-याची घनकचरा व्यवस्थापन भूमी पर्यंत वाहतूक करणे | 99,097.00 |
| 2 | विटा नगरपरिषद हद्दीतील सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुता-या तसेच गटर यांची दैनंदिन साफसफाई करणे व कच-याची घनकचरा व्यवस्थापन भूमी पर्यंत वाहतूक करणे | 95,000.00 |
| 3 | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घनकचरा प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे, घनकच-यापासून Manual कंपोस्ट तयार करणे, घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणे | 1,56,000.00 |
| एकूण | | 3,50,097.00 |

घंटागाडी भाडे

| अं.क्रं. | कामाचे नाव | बयाणा रक्कम |
|---|---|---|
| 1 | घंटागाडी भाडे परत | 7,55,000.00 |

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा